ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

" पेशवेकालीन अस्पृश्य वतनदार (बलुतेदार) "

प्राचार्य डॉ. सोपान जावळे
सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय,
वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर.

• प्रास्ताविक :-

प्राचीन काळापासून महाराष्ट्रात अनेक व्यवसाय व धंदे अस्तित्वात होते. समाजाच्या विविध गरजा भागविण्यासाठी अशा व्यवसायाची गरज भासे. भारत हा खेड्यांचा देश असल्यामुळे खेड्यात राहणाऱ्या लोकांचा मख्य व्यवसाय शेती हाच असे. त्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांच्या गरजा भागविण्यासाठी विविध व्यवसायाची निर्मिती झालेली दिसून येते. पेशव्यांच्या काळात व्यक्तिच्या श्रमाला व सेवेला धंदा किंवा व्यवसाय म्हटले जाई. श्रमाच्या अथवा सेवेच्या मोबदल्यात व्यक्तिला मिळणारा मोबदला हा पैशाच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात मिळे. धंदा किंवा व्यवसाय या संकल्पनाचा अर्थ The Twentieth Century English Maratha Dictionary या शब्दकोशात दिला आहे. Profession याचा अर्थ Superior Kind of Occupation असा आला आहे[1].

प्राचीन काळापासून शेती व्यवसाय हा महाराष्ट्रात महत्वाचा मानण्यात आला होता. बहुसंख्य लोकांचे जीवन शेतीवर अवलंबून होते[2]. तत्कालीन ग्रामप्रदेशाची रचना सहस्त्रबुध्दे यांनी चांगल्या प्रकारे केली आहे. त्यांच्या मते खेडे हे शंभर सव्वासे उंबरे असलेले असे त्याच्या भोवती पिकाऊ जमीन तिच्या पलिकडे गुरांना चारण्यासाठी कुरणे व त्यापलिकडे जंगले. अशी ग्रामप्रदेशाची रचना असे[3]. शेती हा महाराष्ट्रातील लोकांचा महत्वाचा व्यवसाय असला तर शेतकऱ्यास इतराची मदत घ्यावी लागे. शेतकरी शेतीची कामे सुतार, लोहार, चांभार यांच्या मदतीशिवाय करू शकत नाहीत. त्यांच्या जोडीला गावातून इतर काही बलुतेदारांना शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना सेवा देत असत. त्यामध्ये न्हावी, कुंभार, धोबी, महार, मांग इत्यादींचा समावेश होत असे. चाणाक्याने यांना समाजाचे सेवक म्हटले आहे असा उल्लेख आढळतो[4]. अशा प्रकारच्या योजनेमुळे महाराष्ट्रातील खेडी ही स्वयंपूर्ण अशी होती. व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायाच्या बदल्यात दरवर्षी काही धान्याचा हिस्सा दिला जाईल. या पध्दतीला मध्यकाळात बलुते पध्दती म्हंटले जाई[5]. अशा बलुतेदारी पध्दतीच्या यादीत अस्पृश्य समजले जाणारे महार, मांग आणि चांभार अशा अस्पृश्य जातींचाही समावेश होता[6].

पेशवे काळात बलुतेदारांच्या जाती आणि त्यांचा व्यवसाय याचा फारचा जवळचा संबंध होता. प्रत्येक जात विशिष्ट प्रकारचा व्यवसाय वंशपरंपरेने करत. बलुतेदारांच्या पहिल्या श्रेणत महार, मांग, चांभार यांचा समावेश होता. बलते वतनाची श्रेष्ठ व कनिष्ठ श्रेणी जातीवर किंवा स्पृश्य अस्पृश्यतेवर नव्हती[7].

• महार :-

पेशवेकालीन महाराष्ट्रात महार ही अस्पृश्य जातीपैकी एक होती. या जातीतील लोक गावाबाहेर राहत असत[8]. मह + अर म्हणजे महार होय. जंगलारात राहणारा, मृतहर म्हणजे मेलेली जनावरे ओढणारा म्हणजे महार असे या नावाच्या उत्पत्ती विषयी अत्रेंनी गावगाड्यात माहिती दिली आहे[9].

अस्पृश्य वतनदारात जास्त काम महाराला करावे लागे. गावचा सरकारी वसूल तालुक्यात अगर तहसिलात महारालाच पोहचवावा लागे. एखादी प्राणी मेल्यानंतर गावाबाहेर ओढून टाकणे, मृतांच्या दहनास लागणारी लाकडे महाराला न्यावी लागत. याबरोबर त्याला कांही फौजदारी कामे करावी लागत. त्यामध्ये प्रामुख्याने चोरीचा तपास लावणे, चोरांचा मार्ग काढणे, गावात

आल्या-गेल्यांची वर्दी पाटलाला देणे इत्यादी कामे महार जागल्या करीत असे. जागले हे रात्रंदिवस चावडीवर आळीपाळीने पहाऱ्यास बसत. गावाच्या रक्षणाची जबाबदारी रामोशावर असे[10].

महार हा गावचा पहारेकरी असला तरी गावात आब राखून असे. गावातील महारांची संख्या ही गावाच्या विस्तारावर अवलंबून असे. महारांची इतर कामे म्हणजे गावच्या सीमांचे रक्षण करणे, गावच्या सीमेवर होणारे इतरांचे आक्रमण थोपविणे इत्यादी होती. गावच्या सीमाची खडानखडा माहिती असल्याने जमिनी संबंधीच्या खटल्यात त्याची साक्ष महत्त्वाची असे. गावच्या वेशीचे दरवाजे सकाळी उघडणे आणि संध्याकाळी बंद करणे हेही त्याचेच काम असे. पहारेकऱ्यांचे काम करणाऱ्यांना वेसकर म्हणत. गावातील महारांची नावेही त्यांच्या कामानुसार वेगळी असत. उदा. जागल्या, पाडेवार, तराळ, राबता महार, लबेचा महार इत्यादी. रात्री जागरण करून प्रवाशांचे सामान सांभाळणे, ही जागल्याची कामे असत तर प्रवाशांच्या सामानाच वाहतूक करणे हे तराळ करीत असत. सरकारी पत्राची ने-आण करणे, सरकारी निरोप्या म्हणून काम करणे इत्यादी कामे महाराला करावी लागत. या सरकारी कामाबरोबर गावकऱ्यांची कामे त्याला करावी लागत. लग्नाच्या वेळी सरपण आणुन टाकणे, लग्न मंडप झाडून स्वच्छ करणे इत्यादी कामाबद्दल त्याला शेला व त्याच्या पत्नीस साडी चोळी मिळे. होळीच्या दिवशी महार अग्निने होळी पेटवीत असे. महाराला मेलेल्या जनावरांची प्रेते व कातडी घेण्याचा हक्क होता. त्याच्या या विविध सेवासाठी त्यास भाडेमुक्त शेतजमिन मिळे. त्यास हडकत, हडवळा महारीक, हरकी म्हणत असत[11].

पेशवे काळात धान्य साठविण्यासाठी पेवांचा उपयोग केला जाई. ज्यावेळी शेतकरी आपले पेव काढीत असत. तेंव्हा पेवगुड म्हणजे पेवातील खराब झालेली ज्वारी महाराना मिळे[12]. कांही ठिकाणी महाराना प्रतिवर्षाला 10 रूपये मुशाहीरा मिळत असे[13]. जागल्या अथवा रामोशी हा पाटलाचा मदतनीस असे. गावात झालेल्या चोरीचा तपास लावण्याचे काम रामोशी करत असत व ती त्याची जबाबदारी असे[14].

महारांच्या लग्नासंबंधी पेशवेकालीन कागदपत्रावरून माहिती मिळते त्यांची वरात ही पायी निघे[15]. पेशवाईत कांही गावामधून महार जातीचे लोक पाटील असत व ही पाटीलकी टिकविण्यासाठी ते कार्यरत राहत असत[16].

अशा प्रकारे महार हा बलुतेदार वा त्याचा व्यवसाय गावाच्या दृष्टीकोनातून उपयुक्त होता.

• मांग :-

मांगाची जात ही अस्पृश्य जातीतील एक होती म्हणून महारवाड्याप्रमाणे मांगवाडे सुध्दा गावाच्या बाहेर असत[17]. असे असले तरी मांग हा महत्वाचा बलुतेदार समजला जाई. कांही वेळा त्याच्या कामाच्या मोबदल्यात शेतकरी मांगाना दरवर्षी रूपये 10/- देत असत[18]. मांग अंबाडीच्या वेलीच्या तंतुपासून शेतकऱ्यासाठी दोन बनवत असे. बैलावर घालावयाच्या जुवासाठी पक्का दोर मांग बनवित असे. हे शेती साहित्य करण्यासाठी मांगाना आवश्यक ती साधन सामुग्री शेतकरी पुरवित असत[19]. तो केरसुणी पुरवित असे[20]. मृत जनावरे ओढण्याचे काम कांही गावातून मांग करीत असत. सन 1773 च्या एका पत्रात, मेलेले जनावर ओढण्याच्या कामावरून महार व मांग यांच्यात निर्माण झालेल्या तंट्याचा उल्लेख आहे[21]. कांही मांग चोरी करीत असत असे कांही कागदपत्रांवरून दिसून येते[22]. मांग वाजंत्री म्हणून काम करीत असत[23]. महाराप्रमाणे मांगसुध्दा रखवालीची कामे करत असत. सन 1778 मध्ये सातारा शहरात रखवालीसाठी मांग व बेरड होते[24].

मांगास त्यांच्या कामाचा मोबदला हा कांही वेळेस धान्याच्या स्वरूपात मिळे. तर कांही वेळेस पैशाच्या स्वरूपात मिळे. बेंदुर अथवा पोळ्याच्या दिवशी मांग तोरण बांधण्याचे काम करीत असत[25]. त्याला शेतकऱ्याकडून गुऱ्हाळाच्या वेळी रोज ऊस आणि थोडा गुळ मिळत असे[26]. मांगाची लग्ने रानात होत असत. त्यावेळी पायी पडलेले तांदुळ पाडेवार घेत असे[27]. मांगाची लग्नाची वरातही हाल्यावर निघे. परंतु कांही गावातून ती पायी निघे असा उल्लेख आढळतो[28].

महाराप्रमाणे मांग हा बलुतेदार महत्त्वाचा असल्याने तो शेतकऱ्यांच्या उपयोगाचा बलुतेदार समजला जाई. परंतु गावलक्ष्मीच्या वेळी महारा खालोखाल मांगाना सुध्दा मान होता. सन 1735 च्या कऱ्हाडच्या गावलक्ष्मीच्या यात्रेचा वृत्तांत पाहिल्यास मांगापेक्षा महारांना जास्त हक्क मिळाले होते असे दिसून येते[29].

टी. एन. अत्रेंच्या मते मांगामधील एक उपजात म्हणजे मांग गारूडी होय. ही जात फिरस्ती असून साप गारूड्यांच्या खेळ करीत असे[30]. त्याचबरोबर चोऱ्याही ही जात करीत असे.

वरील सर्व माहितीवरून पेशवेकालीन महाराष्ट्रामध्ये मांगाचा व्यवसाय आणि त्यांचे समाजातील स्थान दिसून येते.

• चांभार :-

पेशवेकालीन महाराष्ट्रात चांभाराचा व्यवसाय महार, मांग यांच्या व्यवसायाप्रमाणे महत्त्वाचा होता. त्यामुळे या लोकांना खेड्यामधून असणारे महत्त्व समजून येते. चांभाराला गावातील भरणाऱ्या गोलसभेत स्थान असे[31]. एखाद्या गावाचा चांभार गाव सोडून गेल्यास चमड्याची कामे करून घेण्याची अडचण निर्माण होई. त्यावेळी तेथील गावकरी अशा चांभाराविरूध्द तक्रारी

करीत असत. अशाच एका उल्लेखावरून सन 1779 मध्ये झाल्याचा चांभार आपले पिसुर्ले गाव सोडून आबाल्यास जाऊन राहिला होता. त्यामुळे त्याच्यावर गुन्हेगारी लावली गेली होती[32].

कांही वेळा त्याला गावातून मिळणारे बलुते हे प्रतिवर्षाला 10 रूपये मिळे[33]. गुऱ्हाळाच्या हंगामात त्याला दररोज 5 रूपये, ऊस व थोडा गुळ मिळे. ऊसाच्या मोठ्या बांधण्यासाठी लागणाऱ्या वाख्या त्याला पुरवाव्या लागत असत[34].

चांभाराला मिळणारे बलुते हे किरकोळ कामासाठी असे. परंतु शेतकऱ्याला चांभारापासून नवीन चपलाचा जोड अथवा विहिरीवरील मोट घ्यावयाची असेल तर त्याची रोख किंमत शेतकऱ्याला द्यावी लागे. परंतु सदर मोट फाटल्यास तिला ठिगळ लावण्याचे काम चांभार बलुत्यात करून देई[35].

पेशवाईत जे व्यावसायिक आपापला व्यवसाय करीत असत त्या व्यवसायाबद्दल त्यांना सरकारात कर द्यावा लागे. चांभार सुध्दा त्याच्या व्यवसायाचा कर भरत असे. हा कर जिन्नस आणि रोख स्वरूपात भरला जाई[36].

गावातील वतनदार मंडळींना वर्षाला चपलाचा जोड द्यावा लागे. कांही उल्लेखावरून चामड्याचे दोन जोड देशमुखांना आणि एक जोड देशपांडे यांना द्यावे लागे[37]. अकलुजच्या देशमुखाला तेथील चांभार वर्षाला दसरा सणाच्या वेळी दोन जोड देत असे[38].

कांही वेळा वादामुळे चांभार बुरूड जातीच्या लोकांच्या चपलाचे काम करीत नसत. जुन्नर येथील बुरूडाच्या चपल सांधण्याचे काम चांभार करीत नसल्याने तेथे बुरूड आणि चांभार यांच्यात वाद निर्माण झाला होता[39]. तसेच चांभार बुरूड जातीतील लोकांच्या चपला सांधन नसत्याने ते स्वतःला इतर अस्पृश्य जातीमध्ये श्रेष्ठ समजत असे वाटते[40].

पेशवेकालीन महाराष्ट्रात होळी सणाच्या वेळी होळीची पूजा केली जाई आणि पुजेसाठी रात्रीच्या वेळी गावातून लोकांचे नैवैद्य होळीच्या पुजेच्या वेळी येत त्यावेळी चांभाराला दिवटी धरावी लागे. त्या मोबदल्यात त्याला होळी समोरील 5 नैवैद्य मिळत असत[41]. सन 1748 मध्ये मौजे पारगांव, ता. कन्हे पठार येथील महाराचा आणि चांभाराचा या होळीच्या नैवैद्यावरून वाद निर्माण झाला होता[42].

क्रॉवफोर्डच्या मते मोची ही चांभार जातीतील हलकी जात असून मोची लोक कातडी कमविण्याचा व्यवसाय करणारे होते[43].

चांभारास त्याच्या सेवेप्रित्यर्थ गावकऱ्यांकडून त्याच्या कामास लागणारे कातडे मिळे, नवीन पादत्राणाबद्दल त्यास रोख पैसे मिळत. पाटील, कुलकर्णी इत्यादींच्या घरच्या विवाहाप्रसंगी त्यास त्यांच्या जावयास पादत्राणे भेट द्यावी लागत आणि त्याबद्दल त्यास जेवण मिळे[44]. चांभार जातीतील कांही स्त्रिया या कुणबिणीचा व्यवसाय करीत असत असा उल्लेख आढळतो[45].

बलुतेदारात महार हा ग्रामसेवक महत्वाचा होता. गावकीची बरीचशी कामे तो करीत असे. दोर वळविण्याचे व इतर कामे मांग करीत. चपला आणि चमड्यांची कामे चांभार करीत असे. प्रत्येक जातीत त्याच्या जातीचा विशिष्ट असा धंदा करण्याची मूभा होती. इतर जातीचा व्यवसाय करण्याची मूभा नव्हती. या पध्दतीचा एक फायदा होता तो म्हणजे तत्कालीन ग्रामसंस्था या आर्थिक स्थैर्य प्राप्त झालेल्या होत्या.

:: संदर्भ ग्रंथ सूची ::

1) Ranade N. B., The Twentieth Century English Maratha Dictionary, Poona, 1977, Vol. II, Pp. 1330, 1521.
2) Das Dipakrajani, Economic History of the Deccan, P. 13.
3) सहस्त्रबुध्दे पुरूषोत्तम गणेश, महाराष्ट्र संस्कृती, पुणे, 1971, पृ. 206.
4) Altekar A. S., A History of Village Communities in the Western India, P. 89.
5) Ibid, PP. 90 - 91.
6) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड-15, पृ. 273 - 80.
7) ओतूरकर रा. वि., पेशवेकालीन सामाजिक, आर्थिक पत्रव्यवहार, पृ. 55.
8) वाड ग. चि., पेशवा रोजनिशी, खंड-8, पृ. 286.
9) अत्रे टी. एन., गावगाडा, पृ. 3.
10) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. 246.
11) डॉ. शशिकांत कर्णिक, पेशवेकालीन महाराष्ट्र, सामाजिक व आर्थिक जीवन, भारतीय इतिहास आणि संशोधन, वर्ष-24, पृ. 93-94, एप्रिल, जुन, जुलै, 1987, पृ. 52, 53, 54.
12) ओतूरकर रा. वि., पेशवेकालीन सामाजिक, आर्थिक पत्रव्यवहार, पृ. 32.
13) कित्ता, पृ. 55.

14) कित्ता, पृ. 57.
15) जोशी श. ना. मराठेकालीन समाजदर्शन, पृ. 32.
16) भारतीय इतिहास संशोधन मंडळ, पु. 54, पृ. 2, अंक 19.
17) वाड ग. चि., पेशवा रोजनिशी, खंड-8, पृ. 286.
18) ओतूरकर रा. चि., पेशवेकालीन सामाजिक, आर्थिक पत्रव्यवहार, पृ. 55.
19) डॉ. शशिकांत कर्णिक, पेशवेकालीन महाराष्ट्र, सामाजिक व आर्थिक जीवन, भारतीय इतिहास आणि संशोधन, वर्ष-24, पृ. 93-94, पृ. 51-52.
20) पवार ए. जी., ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड-1, ले. 230.
21) ओतूरकर रा. चि., पेशवेकालीन सामाजिक, आर्थिक पत्रव्यवहार, पृ. 44.
22) सरदेसाई गो. स., पे. द., खंड-43, पृ. 54-55.
23) गवळी पी. ए., पेशवेकालीन जातीय संघर्ष, पृ. 9.
24) वाड ग. चि., पेशवा रोजनिशी, खंड-8, पृ. 133.
25) ओतूरकर रा. चि., पेशवेकालीन सामाजिक, आर्थिक पत्रव्यवहार, पृ. 55.
26) जोशी श. ना. मराठेकालीन समाजदर्शन, पृ. 17.
27) कित्ता, पृ. 25.
28) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड-20, पृ. 225 - 26.
29) जोशी श. ना. मराठेकालीन समाजदर्शन, पृ. 32.
30) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड-21, पृ. 264 - 65.
31) अत्रे टी. एन., गावगाडा, पृ. 85.
32) शिवचरित्र साहित्य, खंड-3, पृ. 66.
33) चापेकर ना. गो., पेशवाईच्या सावलीत, पृ. 101.
34) ओतूरकर रा. चि., पेशवेकालीन सामाजिक, आर्थिक पत्रव्यवहार, पृ. 55.
35) जोशी श. ना. मराठेकालीन समाजदर्शन, पृ. 25-26.
36) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. 343.
37) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड-20, पृ. 12.
38) कित्ता, पृ. 233.
39) चापेकर ना. गो., पेशवाईच्या सावलीत, पृ. 47.
40) सरदेसाई गो. स., पे. द., खंड-22, पृ. 304.
41) पवार ए. जी., ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड-1, पृ. 335-39.
42) जोशी श. ना. मराठेकालीन समाजदर्शन, पृ. 22.
43) ओतूरकर रा. चि., पेशवेकालीन सामाजिक, आर्थिक पत्रव्यवहार, पृ. 50.
44) Crawford, History of Poona and Deccan in it Perspective, P. 167.
45) डॉ. शशिकांत कर्णिक, पेशवेकालीन महाराष्ट्र, सामाजिक व आर्थिक जीवन, भारतीय इतिहास आणि संशोधन, वर्ष-24, पृ. 93-94, पृ. 91.